# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.05.2025** **वार- शनिवार**

---

**आळंदी**

“प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी इथं साडेचारशे एकर जागेत संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल”, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. आळंदी इथं संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. इंद्रायणी नदीचा विकास आराखडा केंद्र सरकारकडून लवकरच मंजूर करून घेण्यात येईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाङ्ग्याचा साक्षेपी चिंतनात्मक आढावा घेणाऱ्या 'नमो ज्ञानेश्वरा' या ग्रंथाचं तसंच त्याच्या ऑडियो बुकचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. तत्पूर्वी फडणवीस यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज समाधीचं दर्शन घेऊन विधिवत पूजा केली.

**दवाखाना**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याची सद्यस्थिती आणि त्यासाठी निधी उपलब्धतेबाबत विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी आरोग्य विभागाकडून आज दूरस्थ पद्धतीने आढावा घेतला. दोन्ही महापालिकांकरिता मंजूर एकंदर 91 दवाखान्यांपैकी पंधरा दवाखाने सुरू झाले आहेत. उर्वरीत आपला दवाखाना तातडीनं सुरु करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी भेट द्यावी, नागरिकांचा विरोध असेल त्या ठिकाणी जनसुनावणी घेऊन जागा निश्चित करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

**अधिकारी**

कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या माध्यमातून नागरी समस्यांचा आढावा घेण्यासाठी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा एक पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. रस्ते, नाले, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि विद्युतपुरवठा इत्यादि विषयांवर अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून समस्यांचं तत्काळ निराकरण

करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. यावेळी कसबा मतदारसंघातील माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**खाटा**
युध्दसदृश्य परिस्थितीमुळे रुग्णालयांनी दहा टक्के खाटा आरक्षित ठेवण्याचे निर्देश पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं शहरातील खासगी आणि महापालिका रुग्णालयांना दिले आहेत. आपत्कालीन  परिस्थितीमध्ये रुग्णांवर योग्य उपचार व्हावेत यासाठी राज्य शासनानं एका बैठकीद्वारे हे निर्देश दिले असल्याचं महापालिकेच्या आरोग्यप्रमुख, डॉक्टर नीना बोराडे यांनी सांगितलं.

**रेल्वे**
दरम्यान, पुणे रेल्वे स्थानकावरील सुरक्षितता वाढवण्यात आली आहे. रेल्वे पोलिस दलाचे अतिरिक्त जवान तैनात करण्यात आले असून सीसीटीव्हीच्या माध्यमातूनही लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

**बनावट संदेश**
मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेत प्रतीक्षा यादी डावलून आधी पंप बसवून देतो, असे बनावट संदेश पाठवून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून आल्या आहेत, अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली. अशा प्रकारचे संदेश आल्यास शेतकऱ्यांनी महावितरणच्या टोल फ्री क्रमांकांवर तक्रार करावी. तसंच, जवळच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांकडं संपर्क साधून शंकेचं निरसन करावं, असं आवाहन महावितरणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार यांनी केलं.

**पुरस्कार**
बासरीप्रमाणं भारतीय शास्त्रीय संगीताच्या रियाजामुळं विद्यार्थ्यांच्या बुद्धिचा विकास सहज शक्य असल्याचं मत ज्येष्ठ बासरीवादक पंडित रोणू मजुमदार यांनी पुण्यात व्यक्त केलं. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनतर्फे त्यांना 'सूर्यदत्त सूर्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. गायिका आनंदी रोणू मजुमदार, शास्त्रीय गायिका सानिया पाटणकर आणि स्थापत्य विशारद सुजाता कोडग यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय स्त्रीशक्ती पुरस्कार' याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक संजय चोरडिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

**छायाचित्र**

पुण्यामध्ये उद्यापासून आंतरराष्ट्रीय छायाचित्र प्रदर्शन भरवण्यात येणार असून यामध्ये जगभरातील निवडक 151 छायाचित्रांचा समावेश आहे. स्टार विन्स फाउंडेशनच्या वतीनं बालगंधर्व कलादालनात हे प्रदर्शन 17 मेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल.

**पुणे आणि परिसरात आज ढगाळ वातावरण आहे, त्यामुळं उष्मा बराच कमी झाला आहे. उद्याही हवामान ढगाळ राहून कमाल 30 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.**

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**